PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 5, ISSUE 5

# स्त्री सबलीकरणात गांधीची भूमिका

**अरुण एस. वाहूळ**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग
विवेकानंद महाविद्यालय, औरंगाबाद
महाराष्ट्र भारत

२० व्या शतकामध्ये ज्यांनी भारतीय इतिहासाला वेगळे वळण दिले. अशा लोकांमध्ये मा. गांधीची गणना केली जाते. गांधी नी आपल्या विचारानुसार भारतीय राजकारणाला वेगळे वळण दिले. गांधीनी भारतीय राजकारणाची समीकरणे बदलून टाकली. काँग्रेसमध्ये आमुलाग्र परिवर्तन घडवून आणले. गांधी विचारांनी प्रत्येक क्षेत्राला प्रभावित करण्याचे काम केले. गांधीनी ज्या पध्दतीने भारतीय राष्ट्रीय चळवळीला दिशा दिली. त्याच पध्दतीने आपल्या रचनात्मक कार्यक्रमाच्या माध्यमातून आपल्या देशातील सामाजिक समस्या दूर करण्याचे काम ते करत होते. गांधीनी भारतीय स्त्रियांच्या उध्दारासाठी भरीव अशी कामगिरी केली आहे. त्यांचे स्त्रियांच्या संबंधीचे दृष्टीकोण, त्यांची त्या संबंधीची भूमिका स्वातंत्र्य चळवळीच्या दरम्यान काय राहिली. गांधीचा एकदंरीत स्त्रियांसंबंधी काय विचार होते, त्यांनी भारतीय महिलांमध्ये कोणती आत्म जागृती निर्माण केली याचा अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत विषयाची निवड करण्यात आली आहे.

खूप कमी लोकांना हे माहिती आहे कि आज भारतीय स्त्री ज्या उंची पर्यंत पोहचली आहे, त्यांना त्या अवस्थेपर्यंत पोहचविण्यामध्ये मा. गांधीची भूमिका महत्वाची राहिली आहे. न्यायमुर्ती रानडेनी एकदा म्हटले होते की, ''आपण सर्वजण मिळून आपल्या संपूर्ण आयुष्यात स्त्रियांच्या हितासाठी जितके काय करु ते काय मा. गांधी फक्त एकाच दिवसांमध्ये करतात.''[१] यावरुन कल्पना केली जाऊ शकते की स्त्रियांच्या सबलीकरणात त्यांचे योगदान किती महान होते. गांधी एका अशा समाजाची निर्मिती करु इच्छित होते, ज्याचा पाया न्याय, समता व शांतीवर उभारलेला असेल. याच तत्वाच्या उद्देशासाठी समाजाच्या दोन मुलभूत

अंगामध्ये (स्त्री व पुरुष) सर्व तत्वात निश्चित समानता प्राप्त कशी होईल या दृष्टीने ते विचार करत होते. देशाच्या सामाजिक व शांतीपूर्वक विकासाची पुर्व अट लैंगिक समानता प्रस्थापित करणे ही होती. गांधी नी अत्यंत उत्कृष्ट शब्दामध्ये स्त्रियांचा गौरव करतांना म्हटले होते की स्त्री ईश्वराची सर्वोष्कृष्ट निर्मिती आहे. ती अहिंसेची मुर्तीमंत अवतार आहे व ती आपल्या धार्मिक आग्रहामध्ये पुरुषापेक्षा खूप पुढे आहे.[२]

बारबरा साऊथर्ड यांच्यानुसार गांधीच्या स्त्री विचारामध्ये दोन तत्वाची सर्वाधिक भूमिका राहिली आहे. पहिले प्रत्येक ठिकाणी व प्रत्येक दृष्टीकोनातून स्त्री पुरुष समानता व दुसरे दोन्हीच्या विशिष्ट लैंगिक भिन्नतेच्या दृष्टीने त्यांच्या सामाजिक कर्तव्यामधील पालन पोषणाची जबाबदारी सांभाळावी व स्त्रियांनी घरगुती प्रबंधकाची. या पध्दतीने दोघानीही परस्परपुरक भूमिका स्वीकारली पाहिले. गांधीजीचा हा विचार अनेक स्त्रीवादी महिलांना पटणे शक्य नाही. ते या संबंधाने असे भाष्य करु शकतात की गांधी महिलांना घराच्या बाहेर येऊ देत नाही. त्यांच्यावर घराची जबाबदारी टाकतात. पण गांधीचा विर समजून घेतानां आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की गांधी स्त्रियांमध्ये एक वेगळे आत्मभान आणण्याचा प्रयत्न करत होते. स्त्रीवादी चळवळीने पुरुषांना आपला शत्रू ठरवून मार्गक्रमण सुरु केले आहे. गांधीजीचा स्त्री विचार याच मुद्यावर घाव घालतो. स्त्रियांना पुरुषांच्या विरोधात नाही तर पुरुष सत्तेच्या विरोधात उभे करतात. १९२१ मध्ये यंग इंडियामध्ये गांधीनी लिहिले होते की, पुरुषाद्वारे स्व निर्मित संपूर्ण वाईटामध्ये सर्वात घृणित, वीभत्स, विकृत जर काय असेल तर ते त्यांच्याद्वारे मानवतेचा अर्धा हिस्सा (जो माझ्यासाठी दबलेली जात नसून स्त्री जाती आहे.) ला त्यांच्या न्यायसंगत अधिकारापासुन वंचित ठेवणे. स्त्रियांच्या प्रति असमानता व अन्यायाचा बोध करतांना गांधी या गोष्टीला ठासून सांगतात की जर मी स्त्रियांच्या रुपाने जन्म घेतला असता तर मी पुरुषांनी थोपलेल्या कोणत्याही प्रकारच्या अन्यायाचा जोरदारपणे विरोध केला असता व त्यांच्या विरोधात विद्रोहाचा झेंडा फडकविला असता.[४]

गांधी सार्वजनिक क्षेत्रामध्ये स्त्रियांच्या सक्रिय भूमिकेचे समर्थक म्हणुन पुढे आले नव्हते. तरी पण १९२१ मध्ये स्त्रियांच्या मताधिकाराचा मुद्दा उपस्थित झाला तेव्हा त्यांनी जोरदारपणे त्या गोष्टीचे समर्थन केले.[५] गांधीनी राष्ट्रीय चळवळीतील स्त्रियांचे महत्व ओळखले होते. मृदुला साराभाई असहकार आंदोलनानंतर गांधीना भेटण्यासाठी गेल्या तेव्हा त्यांनी गांधीना विचारले की आता आम्ही स्त्रियांनी काय करावे. तेव्हा गांधी म्हणाले की मी

भारतीय स्त्री ला स्वयंपाक घराच्या बाहेर काढले आहे. आता ही तुमची जबाबदारी आहे की त्या पुन्हा तेथे जाणार नाही.[६]

गांधी एकीकडे राष्ट्राला स्वातंत्र्य मिळवून देण्याचा प्रयत्न करत होते तर दुसरीकडे भारतीय स्त्रियांना बंधनात टाकणाऱ्या अनिष्ट सामाजिक प्रथेविरुध्द बंद पुकारण्याचा सल्ला देत होते.

## पडदा पध्दतीविषयी गांधीचे विचार :

भारतीय स्त्रियांना बंधनात टाकणाऱ्या सामाजिक प्रथेपैकी गांधी पडदा पध्दतीवर सडकून टिका करतात. गांधी याविषयी खंत व्यक्त करतांना म्हटले की स्त्रियांना पडद्यामध्ये पाहून माझे मन खिन्न होते. यामुळे मला खूप दुःख होते व अपमान वाटतो. ज्यावेळी ही प्रथा सुरु झाली तेव्हा त्या प्रथेचा थोडा फार उपयोग झाला असेल पण आज ही प्रथा एकदम बेकार झाली आहे. यामुळे देशाचे खूप नुकसान होत आहे.[७] गांधी फक्त पडदा पध्दतीवर बोलत नाही तर स्त्रियांना पडदा प्रथेचा विरोध करण्यास प्रवृत्त करतात. तुम्ही पडदापध्दत सोडून द्या, कोणती गोष्ट प्राचीन आहे म्हणजे ती चांगली आहे असे समजणे चुक आहे. जर प्राचीन कालखंडात सर्वच चांगले होते तर पाप कमी प्राचीन नाही. पण पाप कितीही प्राचीन असले तरी ते त्याज्यच रहिल. पडदा कितीही प्राचीन असला तरी बुध्दी आज त्याचा स्वीकार करु शकत नाही. पडद्यापासून होणारी हानी सर्वश्रूत आहे. खरी गोष्ट ही आहे की पडदा ही काही बाह्य वस्तु नाही. ती एक अंतरिक वस्तु आहे. बाह्य पडदा करणाऱ्या कितीही निर्लज्ज स्त्रिया समाजात पाहण्यास मिळतात. ज्या स्त्रिया बाह्य रुपी पडदा करत नाही पण ज्यांनी अंतरिक लाज सोडलेली नाही अशा अनेक पुजनीय स्त्रिया आज जगामध्ये तुम्हाला बघण्यास मिळतात.[८]

यासंबंधी पुढे गांधीजी म्हणतात की माझा कधीही पडदा पध्दतीमध्ये विश्वास नव्हता. ही खूप वेगाने नष्ट होणारी प्रथा आहे. ज्या मुली पडदा पाडण्याचे साहस दाखवून आपल्या शेजाऱ्यांना हे दाखवून देतील की पडदा न ठेवल्यामुळे त्यांना कोणतेही नुकसान झाले नाही. तेव्हा समाज अशा मुलींचे अनुकरण करेल.[९] १९२८ मध्ये अखिल भारतीय महिला संमेलनाच्या कलकत्याच्या बैठकीत पडदा पध्दतीच्या विरोधात एक प्रस्ताव पारित केला होता.[१०]

## संमती विवाहासंबंधी गांधीचे विचार :

अन्य सामाजिक सुधारकांमध्ये गांधी पण मुलगा व मुलींच्या संमतीशिवाय विवाह करण्याच्या विरोधात होते. ते बाल विवाहाच्या पण विरोधात होते. जेव्हा बाल संरक्षण कायदा तयार झाला तेव्हा त्यांनी त्याचे स्वागत केले होते. १९२५ मध्ये त्यांनी म्हटले की मुद्दा फक्त मुलीचा विवाह १४ वर्षापासून १६ वर्षापर्यंत करण्यापर्यंत सीमीत नाही, यामध्ये विना पूर्वअनुमतिच्या विवाह बंधनात अडकविण्याचा पण मुद्दा आहे. विधवा पुनर्विवाहाचे ते कट्टर समर्थक होते. यासंबंधी ते लिहितात की, मी या गोष्टीला वारंवार सांगितले आहे की पुनर्विवाहाचा जितका अधिकार विधुराला आहे तितकाच अधिकार विधवांना पण आहे. स्वच्छेक वैधक्य अभिशाप आहे.[११]

## हुंडा प्रथेविषयी गांधीचे मत :

गांधी हुंडा पध्दतीवर जोरदारपणे आक्रमण केले. विवाह संस्कार हा आपल्या धर्माची परंपरा आहे. विवाहाचे बाजारीकरण जेव्हा आपण करतो, तेव्हा आपण आपोआप धर्माचे बाजारीकरण करतो.[१२] असे गांधी हुंडा पध्दती संबंधी भाष्य केले. १९२९ मध्ये गांधीनी आपल्या देखरेखीखाली एखादी मुलगी असली तर मी तिला आयुष्यभर (एका पत्नीच्या मोबदल्यात काही पैसे स्वीकारुन विवाह करणाऱ्या पुरुषापेक्षा) अविवाहित ठेवले असते.[१३]

गांधीनी महिलांना स्वावलंबनाची स्फूती दिली. महिलांना आर्थिकदृष्ट्या प्रबळ करण्यासाठी वारसा हक्काने मिळणाऱ्या संपत्तीत महिलांची भागीदारी असावी. ही भूमिका त्यांनी स्वीकारली १९३१ मध्ये अखिल भारतीय महिला संमेलनामध्ये हा प्रस्ताव पारित केला की या संमेलनाचे हे मत आहे की वारसा हक्क व संपत्तीच्या संबंधी विषयामध्ये स्त्री व पुरुष दोन्हीचा समान अधिकार निश्चित झाला पाहिजे.[१४]

गांधीना या गोष्टीची पूर्ण कल्पना होती की आर्थिक स्वातंत्र्य स्त्री सबलीकरणामध्ये महत्वाची भूमिका बजावू शकते. त्यामुळे त्यांनी स्त्रियांना चरख्यावर सुत कातणे व विण्यासाठी वारंवार प्रोत्साहीत केले. १९१९ मध्ये नाडियाड येथे महिलांना उद्देशुन ते म्हणाले की तुमच्या जवळ २ ते ३ तास असे असतात त्यावेळी करण्यासारखे तुमच्याकडे काही नसते. तुम्ही त्या वेळेला मंदिरात पुजा अरचनेसाठी खर्च करतात मंदिरामध्ये जपमाळ करणे धर्म आहे, पण वर्तमान काळात भक्तीचे खरे अर्थ कपड्याच्या या कार्यात लिहित आहे.[१५] वास्तवामध्ये गांधीना हे पक्के समजले होते की स्वदेशी आंदोलनाची सफलता तेव्हाच संभव आहे जेव्हा महिला व्यापक स्तरावर मोठ्या प्रमाणावर कताईचे व विणण्याचे काम स्वतःच्या

हाती घेतली. सोबत याद्वारे ते स्त्रियांना आर्थिक दृष्टीने सशक्त व स्वतंत्र करण्याचा प्रयत्न करत होते.

## समारोप :

गांधी स्वातंत्र्य चळवळीच्या दरम्यान महिलांच्या शक्तीचा उपयोग करण्यासाठी त्यांना मुख्य प्रवाहामध्ये आणण्याचा प्रयत्न केला. जेव्हा त्यांना समजले की मुख्य प्रवाहामध्ये येण्यासाठी त्यांना अनेक सामाजिक प्रथाचा अडथळा आहे तेव्हा त्यांनी स्त्रियांच्या मुक्तीसाठी त्या सामाजिक प्रथावर आक्रमण करण्यास सुरुवात केली. ज्या स्त्रियांच्या मार्गात अडथळा ठरत होत्या.

गांधीच्या स्वराज्याच्या सर्वात महत्वपूर्ण व्याख्यामध्ये एकाचा संबंध स्त्रियां व त्यांच्या मुक्तीसाठी होता. गांधीनी भारतीय स्त्रियांना जे आत्मभान दिले ते पुरुषाच्या विरोधात नव्हते तर पुरुषाने निर्माण केलेल्या सामाजिक प्रथेच्या विरोधात होते.

गांधीनी राष्ट्रीय चळवळीच्या आंदोलनाचा केंद्रबिंदु महिलांना बनविले. महिलांना दारुच्या दुकानाच्या बाहेर, विदेशी कपड्याच्या दुकानाच्या बाहेर, धरणे देण्याच्या आंदोलनामध्ये सहभागी करुन घेतले. यातून भारतीय महिलांची असुर्यपश्या या संकल्पनेतून मुक्तता झाली.

## टीपा :

१. सुजाता (संपादित), बापु और स्त्री, सर्वसेवा संघ, वाराणसी २०१२, पृ. ७

२. सुरजीत कौर जौली (संपादित), गांधी एक अध्ययन, नवी दिल्ली. २००१. पृ. २८७

३. बारबरा साऊथर्ड, फेमिनिज्म ऑफ महात्मा गांधी, गांधी मार्ग, ग्रंथ-१३, नं. ७१ ऑक्टोबर १९८१, पृ. ४०३

४. यंग इंडिया, ९ डिसेंबर १९२७

५. बारबरा साऊथर्ड, पृ. ४८५

६. बिपिन चंद्र, द लेगसी ऑफ फ्रीडम मुव्हमेंट, दिल्ली. २००६. पृ. ३

७. सुजाता (संपादित), बाबु और स्त्री, पृ. ५७

८. उपरोक्त, पृ. ५९

९. उपरोक्त

१०. सुरजीत कौर, गांधी एक अध्ययन, पृ. २९१

११. हैल्पलेज विडोज, हरिजन, २२ ऑगस्ट १९३५

१२. यंग इंडिया, फेब्रुवारी १४, १९२९

१३. उपरोक्त

१४. रिपोर्ट ऑफ दी ऑल इंडिया वुमेन्स कॉफ्रेंस, सातवे अधिवेशन, पृ. १३४

१५. पुष्पा जोशी, गांधी ऑन वुमेन, नवजीवन, अहमदाबाद, १९८८. पृ. ३०-३१